# विकसकांनी 'एसआरए' प्रकल्प राबवावा

## डॉ. नितीन करीर यांचे आवाहन; परिवर्तन गृहनिर्माण संस्थेतील सदनिकांचे हस्तांतर

**पुणे, ता. १ : पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ४० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहत आहे. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर या नागरिकांना चांगली घरे मिळणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक विकसकाने किमान एक 'एसआरए' प्रकल्प हाती घ्यावा, असे आवाहन नगरविकास खात्याचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी केले.**

दांडेकर पूल येथे नाईकनवरे डेव्हलपर्सतर्फे उभारण्यात आलेल्या एसआरए योजनेतील परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील १९२ सदनिका आणि सात दुकानांचे रहिवाशांना डॉ. करीर यांच्या हस्ते हस्तांतर करण्यात आले.

या वेळी महापालिका आयुक्त सौरभ राव, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत नाईकनवरे, रणजित नाईकनवरे, क्रेडाई नॅशनलचे अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, महापालिका सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, मशाल संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, वास्तुविशारद संदीप महाजन, नगरसेवक धिरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे या वेळी उपस्थित होते. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचलन केले.




**दांडेकर पूल :- सदनिकाधारकांना फ्लॅटची चावी सुपूर्त करताना (डावीकडून) श्रीनाथ भिमाले, हेमंत नाईकनवरे, डॉ. नितीन करीर, सौरभ राव, सदनिकेचे मालक सलीम पटेल, शिवाजी पारिटे व शाहीद पटेल.**

राज्याच्या शहरी वाहतूक धोरणाचा (स्टेट अर्बन ट्रान्सपोर्ट पॉलिसी) आराखडा तयार झाला आहे. एक महिन्यात हा आराखडा मंत्रिमंडळापुढे सादर करणार असून, त्यानंतर अंमलबजावणीस प्रारंभ होईल, असे डॉ. करीर यांनी सांगितले.

दरम्यान, मेट्रोमार्गालगतच्या टीओडी झोनमधील प्रीमिअममधून महापालिका आणि महामेट्रो यांच्यातील उत्पन्नाचा वाटा ठरविण्यासाठी शनिवारी अधिकाऱ्यांची बैठक घेतली. मात्र, त्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य सरकार घेणार आहे.

## 'एसआरएचा हेतू अपूर्णच'

पुण्यात चौदा वर्षांपूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (एसआरए) स्थापना करूनही अद्याप त्याचा हेतू साध्य झालेला नाही. 'एसआरए' आणि महापालिकेने त्यांची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली, तर झोपडपट्टीवासीयांना घरे मिळतील, अशा शब्दांत नगरविकास खात्याचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी कान टोचले.

पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात करीर बोलत होते. ते म्हणाले, ''झोपडपट्टीतील रहिवासी आणि विकसक यांना जोडणारा पूल म्हणून 'एसआरए'ने काम केले पाहिजे. पण, सध्या हा पूल अर्धवट बांधलेला आहे. मशाल संस्थेने केलेले सर्वेक्षण व त्यासाठी 'क्रेडाई'ने दिलेले पैसे, यातून पुस्तक काढण्यापलिकेकडे 'एसआरए'ने काहीच केले नाही. झोपडपट्टीच्या विकासासाठी 'एसआरए'ने प्रस्ताव तयार केला पाहिजे. पण, सध्या 'एसआरए'साठी बिल्डर पात्र की अपात्र, हे ठरविले जात असल्याने ही योजना मार्गी लागलेली नाही.

ते म्हणाले, ''स्थानिक कारभाराबाबत अनेक तक्रारी येतात. जे हक्काचे आहे ते नागरिकांना मिळालेच पाहिजे. यापुढे तरी महापालिका आणि 'एसआरए'ने व्यवस्थित काम करून विकासासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील झोपडपट्टीवासीयांना घरे मिळवून द्यावीत.''